# Vidyawarta

Peer Reviewed International Research Journal

MAHMUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Samiksha

(Special issue)

April – 2018



Editor

Prof. Virag S.Gawande
Dr.Sanjay J. Kothari
Dr. Dinesh W.Nichit
Dr.Pavan R.Naik

Published By
Sant Gadge Maharaj Art's, Comm. & Sci. Collage Walgaon, Dist.Amravati
&
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

## || Index ||

01) Towards Defining Black Feminism:
**Prof. Mahendra Telgote, Mumbai** || 08

02) Scientific Imagery In The Poems Of Lord Alfred Tennyson
**Dr. Manish Shrihari Gaikwad, Amravati** || 10

03) Domestic Violence In The Age Of Globlization
**Dr. Nilima Dawane, Wani** || 14

04) Woman's Role: Distinct in Ruskin Bond's Writings
**Satish D. Morey,Chikhli Dist.Buldana** || 17

05) Developingreading Habit Among The School Children Of Rural Areas
**Sharada K. Lanjekar, Gadchiroli** || 20

06) Emerging Career Opportunities In Physical Education And Sports
**Dr. Shirish V. Topare, Dist. Amravati** || 23

07) A Case Study on Customers Availing the Benefit of E-Banking Services in Nagpur City
**Prof. Pallavi Shrivastava, Nagpur** || 25

08) Self Confident in Sports Psychology
**Dr. Nitin N. Jangitwar, Dr. D. R. Satupute, Nagpur** || 29

09) Statusand Empowermentof Indian Women In 21st Century
**Dr. Pravinchandra D. Bhakare, Dist. Satara** || 31

10) The plight of Women From Indignity to Individuation -Women in Indo-Anglian Novels
**Dr. Suresh B. Bijawe, Dist. Amravati** || 34

11) Kamala Das :Creative use ofLanguage and imagery
**Asst. Prof. Piyush Vilasrao Dhale, Yavatmal** || 38

12) Role of the library in the emerging wisdom society
**Dr. D. W. Deote, Nagpur, Shri V. S. Malekar, Chandrapur** || 40

13) A Study on Status of Tribal Women in India
**Dr. Nilesh U. Deshmukh, Washim.** || 50

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

14) संत जनाबाईच्या अभंगातील स्त्रीमनाचा आविष्कार || 53
डॉ.ममता दयणे, यवतमाळ

15) यवतमाळ जिल्हयातील घटती भूजल पातळी व खनिज द्रव्य एक अध्ययन || 55
कु. शैलजा कृ. माथने, डॉ. कल्पना देशमख, नागपूर

16) भारतीय स्त्रियांच्या मुक्ती व उत्थानाचे युग पुरुष- डॉ. बाबासाहेब आंबेडकर || 60
डॉ. दिनेश सहदेवराव धाकडे, अमरावती.

17) ग्रंथालयात मुक्तद्वारप्रवेश पद्धतीत ग्रंथपालाची भूमिका || 62
डॉ. डी. डी. सांबारे, नागपूर

18) भारतीय संगीतात संतांचे योगदान || 65
प्रा. डॉ. अर्चना संदीप देशपांडे, यवतमाळ

19) खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेत स्थान || 68
प्रा. चांगदेव केशवराव भाजीखाये, जिल्हा भंडारा

20) बँकींग क्षेत्रावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव || 75
प्रा. संजय उल्हे, नांदुरा

21) ग्रामीण विकास एक विश्लेषण || 77
प्रा.पंढरी जी. मोरे, नागपूर

22) महाडयेथील चवदार तळे सत्याग्रह आणि मनुस्मृतीदहन || 79
डॉ. दिपाली डी. भावे, नागपूर

23) दहशतवाद — एक अध्ययन || 81
प्रा. मनोजकुमार का. भोवते, लाखनी

24) भंडारा जिल्ह्यातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे अध्ययन || 83
डॉ. कल्पना पी. राऊत (शिंदे), जि. भंडारा

25) डॉ. आंबेडकरांच्या अखिल भारतीय शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे राजकारण ... || 87
कु. रोशनी हरिदास गजभिये

26) स्थानिक स्वराज्य संस्थेतील पक्षीय राजकारण विशेष संदर्भ अमरावती महानगरपालिका || 90
डॉ. प्रा.सौ. जयश्री बोराटणे (मोरे), जि.अमरावती

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

१) खाजगीकरणाच्या माध्यमातून भारतीय उदयोगांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करून स्पर्धेत टिकण्याची क्षमता वाढवून देशाचे आर्थिक उत्पन्न वाढविणे.

२) उत्पादकता जास्तीत जास्त प्रमाणात वाढवून जास्तीत जास्त नफा मिळविणे, पोषक वातावरणात काम करून जास्तीत जास्त श्रमाच्या माध्यमातून नफा मिळवून देशाची आर्थीक प्रगती उंचावली जाऊ शकते.

३) वर्तमान युगात आर्थिक उदारीकरण देशाचे आर्थिक भवितव्य उज्वल करण्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाची बाब आहे.

४) उदारीकरणाच्या माध्यमातून आज भारत जगात एक समर्थ शक्ती म्हणून पूढे येत आहे.

५) जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास साधता येतो.

६) जागतिकीकरणाच्या माध्यमातून लोकांची क्रयशक्ती वाढून देशातील लोकांची सुधारणा होऊन देशाची प्रगती उंचावली जाते.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) भारतीय अर्थशास्त्र — डॉ. जी. एन. झामरे

२) भारतीय अर्थव्यवस्था — डॉ. सुधाकर शास्त्री

३) व्यवसायाचे अर्थशास्त्र — प्रा. बी. एल. जीभकाटे

४) व्यवसाय व्यवस्थापनाची मुलतत्वे — डॉ. मेघा काठोरकर

❑❑❑

**20**

# बँकींग क्षेत्रावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव

**प्रा. संजय उल्हे**
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा

**********

**प्रस्तावना :-**

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. जागतिकीकरणच्या युगात तसेच व्यावसायिक स्पर्धा यांच्यात खुप बदल होत आहे. इंटरनेटमुळे सर्व जग एकमेकांशी जुळले आहे. याचा परिणाम सकारात्मक स्वरूपात पाहावयास मिळते. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे बँकींग क्षेत्रात नवीन बदल घडवून येत आहे. बँकींग क्षेत्र हे कोणत्याही देशाच्या आर्थिक व विकासाचा महत्वाचा घटक आहे. आधुनिक काळात बँक ही महत्वपूर्ण सामाजिक संस्था आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या कक्षेत मनोरंजन क्षेत्र, क्रीडाक्षेत्र, वैद्यकिय क्षेत्र, बँकींग क्षेत्र येत आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाला म्हणजेच Internet ला अधिक महत्व प्राप्त झाले.

**माहिती तंत्रज्ञानाचा अर्थ :-**

१. इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर करून वस्तुची खरेदी विक्री करणे तसेच वस्तुच्या खरेदी विकी संबंधी सेवा पुरविणे म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय.

२. डिजीटल टेक्नॉलॉजीच्या विविध साधनाचा वापर करून माहितीची निर्मिती, साठवण, एकत्रीकरण प्रक्रिया, माहितीचे विवरण, प्रस्तुतीकरण, सादरीकरण व संदेशवहन करणे म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय.

**माहिती तंत्रज्ञानाचा बँकींग क्षेत्रावर प्रभाव :-**

माहिती तंत्रज्ञानाच्या बँकींग क्षेत्रावर फार मोठा प्रभाव झालेला आहे. त्यामुळे सर्व बँकींग क्षेत्र एकत्र जोडले गेले. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे बँक आपल्या ग्राहकांना चांगल्या प्रकारे सेवा पुरवित आहे. त्यामुळे ग्राहक आकर्षित होऊन ग्राहकांना आपल्या दैनंदिन आर्थिक व्यवहार करण्याकरिता त्रास सहन करावा लागत नाही.

**ऑटोमेटेड टेलर मशीन (ATM) :-**

स्वयंचलित गणक यंत्र पैसे भरण्यासाठी किंवा काढण्यासाठी ग्राहक स्वत: वापरू शकेल अशा स्वयंचलित इलेक्ट्रॉनिक यंत्राला A.T.M. असे म्हणतात. A.T.M. सुविधा वापरण्यासाठी ग्राहकाला आपल्या बँकेकडून A.T.M. कार्ड मिळवावे लागते. त्यावर चुंबकीय पध्दतीने सांकेतिक भाषा असते. जी ते यंत्र सहज वाचू शकते.

A.T.M. कार्ड वापरण्यासाठी ते कार्ड आधी मशीनमध्ये घालावे लागतात. त्यानंतर स्वत:चा सांकेतिक अंक टाकावा लागतो. मग ते यंत्र पैसे काढण्याची सुविधा देते. यासाठी त्याचा सांकेतांक योग्य असावा लागतो. व्यवहार पूर्ण झाला की ग्राहकाचे A.T.M. कार्ड बाहेर येते. A.T.M. सुविधा २४ तास उपलब्ध असते. त्यामुळे ती ग्राहकांना खूपच सोयीची आहे. ही सुविधा देशविदेशात फिरणाऱ्या प्रवाशांसाठी खूपच उपयुक्त आहे. कारण ते देश अथवा विदेशात कुठेही पैसे काढू शकतात. A.T.M. व्यवहार पूर्ण गुप्त असतात ते सुरक्षित असतात.

**१. क्रेडीट कार्डस् :-**

व्हीसा अथवा मास्टर कार्ड सारखी क्रेडीट कार्ड त्या बँकेत त्या व्यक्तीचे खाते असो व नसो बँकेमार्फत उपलब्ध करून दिली जातात. उधारीवर खरेदी केल्यावर पैसे देण्यासाठी क्रेडीट कार्ड वापर केल्याने ग्राहकांना बरोबर पैसे बाळगण्याची गरज नसते. क्रेडीट कार्डवर खरेदी केल्यावर बँका सदर रक्कम बँकेत भरण्यासाठी ग्राहकाला पैसे भरले नाहीतर मात्र बँका खूप जास्त दराने या रकमेवर व्याज आकारणी करतात.

**२. डेबीट कार्ड :-**

व्यापारी बँका आपल्या बचत आणि चालू खातेधारकांना हे डेबीट कार्ड उपलब्ध करून देतात. या कार्डाचा उपयोग कार्डधारक विविध ठिकाणी रोख खरेदी पैसे देऊन करण्याऐवजी कार्डचा वापर करू शकतात. ही रक्कम संबंधीत खातेदाराच्या खात्यात त्वरित नावे केली जाते.

**३. इलेक्ट्रॉनिक निधी वर्ग (Electronic Fund Transfer) :-**

या पध्दतीत ग्राहकाला एका खात्यातून आपल्या दुसऱ्या खात्यात रक्कम वर्ग करता येते. यामध्ये भागांवराच्या लाभांश, कर्जरोख्यांवरचे व्याज, पगार, सेवानिवृत्तीवेतन इ. खात्यात जमा होते तर वीज बिल, टेलिफोन वरील कर्जाचे हप्ते, विमा हप्ते, क्रेडीट कार्डच्या देणे रकमा इ. नावे टाकल्या जातात.

**४. रिअल टाईम ग्रॉस सेरलमेंट (RTGS) :-**

या पध्दतीत एका बँकेकडून दुसऱ्या बँकेकडे तात्काळ निधी वर्ग करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. रिअल टाईम म्हणजे तात्काळ व्यवहार पूर्ण होतो. त्यासाठी थांबावे लागत नाही. व्यवहार जेव्हा घडतात तेव्हाच लगेच ते पूर्ण केले जातात. म्हणजेच एकमेकांबरोबरच्या व्यवहारांशी निव्वळ शिल्लक आकडेमोड करून बसण्यापेक्ष व्यवहार घडला की लगेच तो पूर्ण केला जातो.

**५. नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT) :-**

या सुविधेच्या माध्यमातून व्यक्ती, भागीदारी संस्था अथवा कंपन्यांना बँकेच्या शाखेतून दुसऱ्या कोणत्याही बँकेच्या शाखेत खाते असणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, भागीदारी अथवा कंपनीच्या बँकखात्यात पैसे वर्ग करता येतात. या पध्दतीत व्यवहारांवर गटागटाने प्रक्रिया केली जाते. गटागटाने प्रक्रिया केली जाते. गटाला ठराविक व्यवहार साठेपर्यंत वाट पाहुन जेव्हा ते होतील तेव्हा ते पूर्ण केले जातात.

**६. फोन बँकींग :-**

या प्रकारचे फोन बँकींग खाते असणारा खातेदार आपल्या फोनचा वापर करून मुदत ठेव ठेवणे, पैसे पाठविणे ड्राफ्ट, बिलाचे पैसे देणे व स्वीकारणे इ. बँकींग व्यवहार करू शकतो. अलीकडे बहुतांश लोक मोबाईल फोनचा वापर करीत आहेत. त्यामुळे मोबाईलचा वापर करूनही सुविधा घेता येते. मोबाईल फोनवर येणाऱ्या संदेशाचाही फायदा फोन बँकींग सुविधेत मिळून आपल्या व्यवहाराविषयी ग्राहकाला लवकर माहिती उपलब्ध होते.

**७. इंटरनेट बँकीग :-**

अलिकडे संगणक व इंटरनेटचा वापर खूप वाढला आहे. याचा लाभ घेण्यासाठी बँकांनी Internet बँकींग ही सुविधा उपलब्ध करून दिलीआहे. ज्या खातेदाराचे बँकेत खाते आहे. तो बँकेचे संकेतस्थळ उघडून स्वत:चे खाते पाहु शकतो. तो बिलाचे पैसे, देणे, पेसे वर्ग करणे, मुदत ठेव ठेवणे, बिले वसूल करणे इ. संबंधी सुविधा या माध्यमातून मिळवू शकतो.

**८. कोअर बँकींग :-**

कोअर बँकींग सोल्युशन अथवा सेंट्रलाईज्ड बँकीग सोल्युशन सीबीएस या नावाने ओळखले जाते. या पध्दतीमुळे ग्राहकांचे रूपांतर केवळ एका शाखेचा ग्राहक यातून बँकेचा ग्राहक असे होते व त्या बँकेच्या कोणत्याही शाखेत आपले व्यवहार करणे त्याला शक्य होते. त्यामुळे अधिक वेगाने व कार्यक्षमपणे आणि केव्हाही आपले व्यवहार करणे ग्राहकाला शक्य होते. या पध्दतीत ही सुविधा असलेल्या बँकेच्या कोणत्याही शाखेत खाते उघडून त्या बँकेच्या देशभरातील कोणत्याही शाखेत ग्राहक आपले व्यवहार करू शकतो.

**निकर्ष :-**

माहिती तंत्रज्ञानाचा बँकींग क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला आज दिसून येतो. नेट बँकींगमुळे घर बसल्या बँकेचे व्यवहार करू शकतो. घर बसल्या वस्तुची खरेदी करू शकतो. त्यामुळे वेळेची बचत झालेली आहे. बँकेतील आपल्या खात्याबद्दलची माहिती ग्राहक घरून मिळवू शकतात. मोबाईल बँकींगमुळे रेल्वे तीकीट, एअर तीकीटचे आरक्षण घर बसल्या होते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून बँकेचे व्यवहार करणारे ग्राहक खूप वाढलेले आहे, असे दिसून येते.

**संदर्भग्रंथ :-**


१. अर्थलवार

२. माहिती तंत्रज्ञान व डाटा प्रोसेसिंग - प्रा. कोसने

३. भारतीय बँकींग पध्दती - डॉ. मेघा कविटकर

४. विकासाचे अर्थशास्त्र - डॉ. जोस्त्ना देशपांडे


❑❑❑